महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१**

**फो.नं. ०२०-२६१२२०७६** **email: ddtp.ho@maharashtra.gov.in**
**फॅक्स-०२०/२६१२७०४१** **email:** do_tpv6@rediffmail.com

व.प्रि.
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक,नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 209 दिनांक- 06-02-25
संबधित अधि./कर्म.
web publication
न.र. 06/02/25 6-2-25 उ.स.न.र.

**विकास योजना- उमरखेड, जि. यवतमाळ.**
मौजा उमरखेड, येथील स.नं.३३१/३/२, क्षेत्र १.२१ हे. या जमिनीचे मंजूर सुधारित विकास योजनेतील आ.क्र.१८ "बगीचा" या आरक्षणाने बाधीत क्षेत्राबाबत...
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम-१२७ (२) अन्वये आदेश निर्गमित करणेबाबत.

**आदेश क्र.:** डि.टी.पी./वियो- उमरखेड (मु.ह.)/कलम १२७(२) /आदेश/टिपीव्ही-६/५९७०, दि. ३०.१०.२०२४

सोबतचे मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

**(श. म. निकम)**
कार्यासन अधिकारी, टिपीव्ही-६,
नगर रचना संचालनालय, पुणे.

**प्रति,**

मा. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** नगर रचना संचालनालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती आणि सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांना पाठवाव्यात.

**प्रत माहिस्तव सादर :-**

१. मा.प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग (नवि-३०), मंत्रालय, मुंबई -३२ यांना सादर.
२. मा. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.
३. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
४. मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

५. मा. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरचे आदेश त्यांचेकडील त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये अभिलेखार्थ जोडावेत. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. मा. सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ.

/- प्रस्तुत प्रकरणी त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **पाच प्रती** ह्या शासनाकडून/संचालनालयाकडून वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन तयार करुन, त्या संचालनालयास विहीत मार्गाने सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, उमरखेड नगर परिषद, उमरखेड, जि.यवतमाळ.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. अर्जदार श्री. अनील बापूराव व्यवहारे, रा. काळा मारुती मंदीर जवळ, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ.

महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१.**

## आदेश

क्र.डि.टी.पी./वि.यो.उमरखेड (सु.)/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-६/ ५८१०, दि. ३०.१०.२०२४.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, उमरखेड नगरपरिषदेची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२७९८/१०२६/प्र.क्र.५५/९८/ नवि-१३, दि. २७.०१.१९९९ (यापुढे **"उक्त अधिसूचना"** असे संबोधिले आहे) अन्वये मंजूर केली असून ती, दि. १५.०४.१९९९ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे **"उक्त मंजूर सुधारित विकास योजना"** असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, मौजा उमरखेड, ता. उमरखेड येथील स.नं. ३३१ या जमिनीचे अंदाजे १.८७६२ हे. आ.क्र. १८ "बगीचा" या आरक्षणाने (यापुढे "**उक्त आरक्षण** " असे संबोधिले आहे) बाधित होत असून, उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, उमरखेड आहे (यापुढे "**उक्त समुचित प्राधिकरण**" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासुन १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, मौजा उमरखेड, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथील स. नं. ३३१/३/२, क्षेत्र १.२१ हे. जमिनीचे (यापुढे **"उक्त जमीन"** असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्रासंदर्भाने संबंधित जमीन मालक (यापुढे "**उक्त जमीन मालक**" असे संबोधिले आहे) यांचे वतीने ॲड जे. आर. पवार यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदीन्वये उक्त समुचित प्राधिकरणावर दि.०२.०८.२०१९ रोजी सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिलेले आहे) बजावलेली आहे व ती समुचित प्राधिकरणास दि. ०५.०८.२०१९ रोजी प्राप्त झालेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने विहित मुदतीत उक्त आरक्षण उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) चे तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३१८८/२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १२.०९.२०२३ रोजीच्या निर्णयान्वये (यापुढे "**उक्त निर्णय**" असे संबोधिले आहे) उक्त जमिनीचे बाधित क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत करणेसंदर्भानेचे आदेश शासन राजपत्रात प्रसिध्द करणेबाबत प्रतिवादींना निर्देश दिलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरखेड यांनी मा. उच्च न्यायालयाचे उक्त निर्णयानुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत करणेसंदर्भाने उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदींतर्गत आदेश निर्गमित करणेबाबतचा प्रस्ताव दि. ०४.१०.२०२३ रोजीचे पत्र क्र. ३५२/२०२३-२४ अन्वये सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांचेकडील पत्र क्र. १५८४, दि. १३.१२.२०२३ अन्वये, मा. न्यायालयाने उक्त जमिनीचे बाधित क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत करणेसंदर्भाने आदेशित केलेले असल्याने उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये आदेश निर्गमित करणे उचित होईल, असा अहवाल प्रामुख्याने सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचे मोजणी नकाशानुसार (मो.र.क्र.४४/२०१९, दि.१६.०२.२०१९) उक्त जमिनीचे १.२१ हे. क्षेत्रापैकी उत्तर हद्दीलगतचे ९.० मी. रूंद विकास योजना रस्त्याचे क्षेत्र सोडून, १.१३१७ हे. क्षेत्र उक्त आरक्षणाने बाधित होत असल्याचे स्पष्ट होत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीचे १.१३१७ हे. (११३१७ चौ.मी.) क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती / जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतूदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतूदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत -

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे:-

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र (हे.) | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून भागशः व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|
| १ | उमरखेड नगर परिषद, मौजा उमरखेड, ता. उमरखेड, जि.यवतमाळ. | आ. क्र. १८, " बगीचा " **१.८७६२ हे.** | मौ. उमरखेड, खंड २. स.नं. ३३१/३/२ पैकी | **१.१३१७ हे.** |

**टिप**:- १. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून भागशः मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, उमरखेड नगर परिषद, उमरखेड, जि. यवतमाळ यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभाग, संचालक, नगर रचना, सत्यमेव जयते, महाराष्ट्र शासन, पुणे)

**(अविनाश भा. पाटील)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Maharashtra State**
**Directorate of Town Planning & Valuation**
**Central Building, Pune- 411 001.**

## ORDER

No. D.T.P/D.P. Umarkhed (R)/Sec-127(2)/Order/TPV-VI/ 5910, Date: - 30.10.2024.

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Revised Development Plan of Umarkhed Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government in Urban Development Department vide its Notification No.TPS/2798/1026/CR-55/98/UD-13, dated 27.01.1999 (hereinafter referred to as "**the said Notification**") & came into force with effect from dated 15.04.1999 (hereinafter referred to as the "**said Sanctioned Revised Development Plan**")

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, admeasuring approximate area of 1.8762 Ha. the land bearing S.No. 331 of Mouza Umarkhed is affected by the Reservation No. 18 "Garden" (hereinafter referred to as **"the said Reservation")** for which Appropriate Authority for acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Umarkhed (hereinafter referred to as **"the said Appropriate Authority"**);

And whereas, the land under said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "**the said Land Owner**") of the land bearing S. No. 331/3/2, area admeasuring 1.21 Ha. of Mouza Umarkhed, Tal. Umarkhed, Dist. Yavatmal (hereinafter referred to as "**the said Land**") had served a notice dt. 02.08.2019 throuh Adv. Shri. J. R. Pawar as per the provisions of section 127(1) of the said Act in respect of the area affected by the said Reservation (hereinafter referred to as **"the said Notice")** on the said Appropriate Authority and the same has received to Appropriate Authority on 05.08.2019;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (1) of the said Act has been taken by the said



TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT DIRECTOR OF TOWN PLANNING M.S. PUNE

Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice by the said Land owner;

And whereas, in Writ Petition No. 3188/2022 filed by the said Land owner in the Hon'ble High Court of Judicature at Mumbai, Nagpur Bench, the Hon'ble High Court has directed to the Respondent vide decision dt. 12.09.2023 (hereinafter referred to as **"the said Judgement"**) that, to notify the lapsing of the said Reservation on the area affected of the said Land by an order to be published in the official Gazzete;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Umarkhed has submitted the proposal vide letter No. 352/2023-24, dt. 04.10.2023 to issue an order in respect of lapsing of the said Reservation on the said Land under the provisions of section 127(2) of the said Act as per the said Judgement of the Hon'ble High Court;

And whereas, the Joint Director of Town planning, Amravati Division, Amravati has submitted report vide it's letter No. 1584, dated 13.12.2023; mainly that, it is necessary to issue order under the provisions of section 127(2) of the said Act as directed by the Hon'ble High Court in respect of lapsing of the said Reservation on the area affected of the said Land;

And whereas, as per the Measurement Plan (M. R. NO. 44/2019, dt.16.02.2019) of the said Land, it is clear that, out of area admeasuring 1.21 Ha. of the said Land excluding area under 9.0 mt. Development Plan Road adjacent to the north boundary, area affected by the said Reservation is 1.1317 Ha;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservations on the said Land in the said Sanctioned Revised Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said reservation partly on the area admeasuring approximately 1.1317 Ha. (11317 Sq. mt.) of the said land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dt. 01.12.2016, has delegated the powers exercisable by it under the provisions of section 127 (2) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation partly in respect of the said land as per the provisions of section 127 (2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added:-

**SCHEDULE**

| **Sr. No.** | **Municipal Council Mouza, Taluka and District** | **Reservation in the said Sanctioned Revised Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report** | **Description of the said Land** | **Approximate Area of the said Reservation lapsed partly (Ha. )** |
|---|---|---|---|---|
| 1 | Umarkhed Municipal Council, Mauja Umarkhed, Taluka- Umarkhed, Dist.- Yavatmal | Site No.18 " Garden" **1.8762 Ha.** | Mauja Umarkhed, Part 2, S. No. 331/3/2 (part) | **1.1317 Ha.** |

**Note:-** 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent lands under the said Sanctioned Revised Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the part area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Umarkhed, District Yavatmal during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**.

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT DIRECTOR OF TOWN PLANNING M.S. PUNE

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.